महाराष्ट्र इकॉनॉमिक समिटमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांची ग्वाही

# सुखद प्रवास... स्वस्त वीज

## कोस्टल रोड तीन महिन्यांत मार्गी

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

**जागोजागी जॅम होणाऱ्या मुंबईतील वाहतुकीची कोंडी फोडणे हाच शहराच्या विकासातील कळीचा मुद्दा आहे. एलिव्हेटेड लोकल ट्रेन, भूमिगत मेट्रो अशा महत्त्वाच्या पायाभूत सुविधांना राज्य सरकारने मंजुरी दिली असून, पुढील दोन-तीन महिन्यांत कोस्टल रोड प्रकल्पही मार्गी लावला जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केली.**



'महाराष्ट्र औद्योगिक आणि आर्थिक विकास असोसिएशन'ने आयोजित केलेल्या एकदिवसीय 'महाराष्ट्र इकॉनॉमिक समिट'मध्ये फडणवीस यांनी मुंबईकरांचा प्रवास सुखदायी करण्याचे आश्वासन दिले. शहरांच्या विकासाबाबत केंद्रातील मोदी सरकारचा दृष्टिकोन अत्यंत सकारात्मक आहे. कोस्टल रोड प्रकल्प सुरू करण्यासाठी फक्त पर्यावरण खात्याची परवानगी मिळणे बाकी आहे. आता त्यात दिरंगाई होणार नाही, असे फडणवीस म्हणाले.

>> ब्रँड महाराष्ट्र हवा...१५



### 'किनारा' वेगवान

■ नरिमन पॉइंट-मालाड मार्वे रोड-बोरीवली असा ३५.५ किमीचा हा कोस्टल रोड उभा करण्यासाठी दहा हजार कोटींचा खर्च येणार आहे. कोस्टल रोड रस्ता, फ्लायओव्हर आणि समुद्री टनेल अशा तीन मार्गांनी प्रवास करणार आहे. या प्रकल्पासंदर्भात गेल्या आठवड्यात मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय पर्यावरण खात्याकडे सादरीकरण केले आहे.




### 'पहिले उड्डाण' २०१९मध्येच!

■ मुंबई हे आंतरराष्ट्रीय शहर असल्याने रस्त्यावरील वाहतूक जेवढी प्रवाही राहिली पाहिजे, तेवढी आकाशातील वाहतूकही राहिली पाहिजे. त्यासाठी पनवेलमधील नवा विमानतळ प्रकल्प प्राधान्याने पूर्ण केला जाणार आहे. सन २०१९मध्ये नवी मुंबई विमानतळावरून पहिले उड्डाण होईल, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले.



### एकाच तिकिटावर प्रवास?

■ बृहन्मुंबईतील चाकरमान्यांना नजिकच्या काळात एकाच तिकिटावर प्रवास करण्याची सुविधा मिळण्याची शक्यता आहे. लोकल रेल्वे, बेस्ट बस आणि मेट्रो या तीनही प्रवासासाठी एकच तिकीट देण्याबाबत संबंधित यंत्रणांशी चर्चा सुरू असल्याची माहिती 'एमएमआरडीए'चे आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी इकॉनॉमिक समिटीमध्ये दिली.

## 'महावितरण'ने पैसा उभारावा

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

**'महावितरण' कर्ज व थकबाकीच्या ओझ्याखाली असून, तिला अर्थसाह्यासाठी सरकारला मदत करावी लागते, वा कर्जासाठी हमी द्यावी लागते. ही पद्धत कायम ठेवता येणार नाही. 'महावितरण'ला खुल्या बाजारात रोखे वा समभाग विक्रीतून निधी उभा करावा लागेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी सुचवले.**

'महाराष्ट्र औद्योगिक आणि आर्थिक विकास असोसिएशन'ने (एमआयईडीए) आयोजित केलेल्या 'महाराष्ट्र इकॉनॉमिक समिट'मध्ये बोलताना मुख्यमंत्र्यांनी महावितरणला वरील पर्याय सुचवला.

राज्याच्या औद्योगिक विकासात प्रचंड महाग वीज हा मोठा अडथळा ठरू लागल्याची वस्तुस्थिती समिटमध्ये मांडली गेली. त्यावर फडणवीस म्हणाले, 'शेती क्षेत्राला काही हजार कोटींचे अनुदान दिले जाते. वीज केंद्रांना पूर्ण क्षमतेने वीजनिर्मिती करता येत नाहीत. त्यामुळे महावितरण आर्थिक दुरवस्थेत आहे. अशा स्थितीत स्वस्त विजेचा पुरवठा करणे शक्य होत नाही. त्याचा फटका औद्योगिक महाराष्ट्राला बसला आहे!'

### सूचिबद्ध महावितरण?

■ रोखे वा समभाग विक्रीतून निधी उभा करायचा असेल, तर 'महावितरण'ला शेअर बाजारांत सूचिबद्ध करावे लागेल. त्यानंतर, 'सेबी'च्या परवानगीने आयपीओ वा अन्य पर्यायांचा वापर करून भांडवल गोळा करता येईल. मात्र, अशारितीने खुल्या बाजारातून निधी मिळवण्यासाठी 'महावितरण'ला कार्यक्षमता सिद्ध करावी लागणार आहे, तरच कंपनीच्या 'आयपीओ'ला गुंतवणूकदारांचा प्रतिसाद मिळू शकेल.



### महाग विजेमुळे उद्योग राज्याबाहेर

■ राज्यातील औद्योगिक विजेचे दर सर्वात महाग असल्याने छोटे व मध्यम स्वरुपाचे उद्योग शेजारच्या राज्यांमध्ये स्थलांतरित होऊ लागले आहे. दक्षिण महाराष्ट्रातील खूप उद्योग कर्नाटकात जात असल्याचे 'एमआयईडीए' संस्थापक-अध्यक्ष चंद्रकांत साळुंखे यांनी निदर्शनास आणून दिले. महाराष्ट्रात औद्योगिक वीजदर प्रति युनिट ९.५० रुपये असून गुजरात, मध्यप्रदेश, आंध्र प्रदेशमध्ये अनुक्रमे साडेपाच, चार आणि साडेपाच रुपये दराने उद्योगांना वीज मिळते. ही समस्या तातडीने सोडवायला हवी, असा मुद्दा साळुंखे यांनी उपस्थित केला.